डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादचे कुलगुरु डॉ.बी.ए.चोपडे यांच्या कामकाजाची चौकशी करुन वस्तुस्थिती दर्शक प्राथमिक चौकशी अहवाल सादर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांक तक्रार-२०१६(११४/१६)/विशि-४

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०००३२.

दिनांक : २३ मार्च, २०१८.

प्रस्तावना:-

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.बी.ए.चोपडे यांचे कामकाजासंदर्भात अनेक संघटना, व्यक्ती यांनी मा.राज्यपाल तथा कुलपती यांच्याकडे तसेच शासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्याचा गोषवारा या आदेशासोबतच्या परिशिष्ट मध्ये आहे. मा.कुलपती तथा राज्यपाल यांनी दिलेल्या निर्देशानुसार या सर्व तक्रारींची पडताळणी करुन त्याबाबतचा वस्तुस्थिती दर्शक प्राथमिक चौकशी अहवाल मागविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

१. परिशिष्ट अ मधील तक्रारीच्या संदर्भात प्राथमिक चौकशी करण्याकरिता डॉ.एस.एफ.पाटील, सेवानिवृत्त कुलगुरु यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

२. डॉ.एस.एफ.पाटील, चौकशी अधिकारी, यांना चौकशी दरम्यान आवश्यक वाटतील ते दस्तऐवज विद्यापीठामार्फत उपलब्ध करुन देण्यात यावीत.

३. चौकशी अधिकारी यांना चौकशी कामी आवश्यकतेनुसार संबंधीतांचा जाब-जबाब नोंदविता येईल.

४. उपरोक्त चौकशीच्या अनुषंगाने आवश्यक ते सर्व दस्तऐवज, कागदपत्र उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित विद्यापीठाच्या कुलसचिव यांची राहील. याकामी विद्यापीठाचे उप कुलसचिव/सह कुलसचिव सहाय्य करतील.

५. उपरोक्त चौकशीच्या कालावधीत डॉ..एस.एफ.पाटील, चौकशी अधिकारी यांना वाहन/गेस्ट हाऊस तसेच इतर आवश्यक त्या सोई-सुविधा पुरविण्याची जबाबदारी कुलसचिव डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांची राहील.

६. डॉ.एस.एफ.पाटील,सेवानिवृत्त कुलगुरु यांना सदरहू चौकशी कामी मानधन तसेच इतर अनुषंगिक भत्ते याबाबत स्वतंत्र आदेश काढण्यात येतील.

७. चौकशी अधिकारी यांनी आपला प्राथमिक वस्तुस्थितीदर्शक अहवाल २ महिन्याच्या आत थेट शासनाकडे सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२८१२५९४२०४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Siddharth Kharat

Digitally signed by Siddharth Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6f8cb55012423727bece629d954713c1ec29 62a9ca9b909643170e56321cfd24, cn=Siddharth Kharat
Date: 2018.03.28 13:02:20 +05'30'

(सिद्धार्थ खरात)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति :-

१. मा.कुलपती तथा राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. डॉ.एस.एफ. पाटील, सेवानिवृत्त कुलगुरु, प्लॉट नं. १७, माया बंगला, शरावती को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, नाद ब्रम्ह सोसायटी जवळ, कै.किरण धुमाळ पथ, वारजे, पुणे-५८
३. मा.कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठावाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
४. मा.कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठावाडा विद्यापीठ, औरंगाबाद
५. मा.मंत्री (उवतंशि), यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
६. निवडनस्ती विशि-४.